मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीकरीता माध्यम आराखडयास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत

## महाराष्ट्र शासन

**कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,**

**शासन निर्णय क्रमांक : कौविउ-२०२४/प्र.क्र.१२९/प्रशा-२**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : ०२ सप्टेंबर, २०२४

**वाचा:-** १) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग,
शासन निर्णय क्र : संकीर्ण-२०२४/प्र.क्र.९०/व्यशि-३, दि. ०९.०७.२०२४
२) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. २९.०७.२०२४ च्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची रोजगार मिळण्याची क्षमता वाढविण्याकरीता संदर्भाधीन दि. ०९.०७.२०२४ च्या शासन निर्णयान्वये “मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजना” कार्यान्वित करण्यात आली आहे. सदर योजनेची माहिती अधिकाधिक युवकांपर्यंत पोहचून सदर योजनेचा लाभ जास्तीत जास्त उमेदवारांना होण्यासाठी योजनेचा व्यापक प्रचार व प्रसिद्धी होणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने सदर योजनेची प्रसिध्दी विविध माध्यमातून करण्याकरीता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांच्याद्वारे माध्यम आराखडा तयार करण्यात आला आहे. सदर माध्यम आराखड्यास माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीच्या दि. २९.०७.२०२४ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. विभागाच्या विनंतीनुसार सदर आराखड्यात अंशत: बदल करुन सुधारीत माध्यम आराखडयास समितीच्या दि. ०६.०८.२०२४ च्या बैठकीत मान्यता देण्यात आली आहे. सदर सुधारीत आराखड्यास व सदर आराखडा राबविण्याकरीता आवश्यक खर्चास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षामध्ये मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेल्या माध्यम आराखडयास व सदर आराखडा राबविण्याकरीता ₹ १,९५,२१,१००/- (अक्षरी ₹ एक कोटी पंचाण्णव लक्ष एकवीस हजार शंभर फक्त) इतक्या खर्चास याद्वारे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. मान्यताप्राप्त माध्यम आराखड्यास येणाऱ्या अंदाजित खर्चाच्या तपशीलाबाबतचे परिशिष्ट- अ सोबत जोडले आहे.

२. माहिती व जनसंपर्क संचालनालयाने संबंधित जाहिरात एजन्सी/आस्थापनांना कार्यादेश देण्याच्या अनुषंगाने प्रस्तुत प्रयोजनाकरिता पुढील कार्यवाही करावी.

३. जाहिरात खर्चाची देयके आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय यांना थेट सादर करण्यात यावीत. सदर देयके सन २०२४-२५ या चालू आर्थिक वर्षात कोणत्याही प्रकारचा विलंब न करता देय होतील याची दक्षता आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, नवी मुंबई यांनी घ्यावी.

४. प्रस्तुत योजनेचा प्रचार व प्रसिद्धी कार्यक्रम राबविण्यासाठी खर्च करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय/आदेश /परिपत्रके तसेच वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये निर्गमित केलेल्या वित्तिय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ मधील तरतूदी /अटी व शर्तीचे पालन करावे.

५. प्रस्तुत प्रयोजनासाठी येणारा खर्च लेखाशिर्ष, मागणी क्र. झेडए-०२, २२३०-कामगार व सेवायोजन, ०२ सेवायोजन, ००४ संशोधन, सर्वेक्षण व सांख्यिकी, (०१) (०१) सेवायोजन रोजगार उपलब्धताविषयक माहिती व युवक रोजगार विषयक सेवा (२२३० ११०७), २६ जाहिरात व प्रसिद्धी या लेखाशिर्षाखाली सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०९०२१११६०००५०३ असा आहे. हा निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SHRINIVAS
JAGANNATH SHASTRI

Digitally signed by SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SKILLS EMPLOYMENT ENTREPRENEURSHIP AND INNOVATION DEPARTMENT,
2.5.4.20=562c9a4a27312e1de46dbbd470c2f1a3e466d159bc4c9bd7f2f9cc64766abce2, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=C02F19AC7E7AB3A50D817C95CF483E33229CF0CBB03283B175900630F81D2337, cn=SHRINIVAS JAGANNATH SHASTRI
Date: 2024.09.02 11:16:35 +05'30'

**( श्रीनिवास शास्त्री )**
**शासनाचे सह सचिव**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव
५) मा. मंत्री, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता यांचे खाजगी सचिव
६) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
७) मा. विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधान मंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई.
१०) आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई

११) सर्व जिल्हाधिकारी
१२) महालेखापाल, ( लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१३) महालेखापाल, (लेखा परीक्षा), महाराष्ट्र -१/२, मुंबई/नागपूर.
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१५) सर्व उप आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता आयुक्तालय,
१६) सर्व सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,
१७) निवडनस्ती- कार्यासन प्रशा-२

शासन निर्णय क्रमांकः कौविउ-२०२४/प्र.क्र.१२९/प्रशा-२, दि. ०२.०९.२०२४ सोबतचे

## परिशिष्ट - अ

# मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षण योजनेच्या प्रचार व प्रसिद्धीसाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या माध्यम आराखडा नियोजन व अंमलबजावणी समितीने मान्यता दिलेला माध्यम आराखडा

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**कौशल्य विकास विभाग प्रस्तावित माध्यम आराखडा**

**जाहिरात निर्मिती साहित्य तपशील (Production of Creative)**

| क्र. | माध्यम | स्वरुप | तपशील | रक्कम (प्रती नग) | संख्या | रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **प्रिंट** | | प्रिंट आणि इतर बाह्य माध्यमांकरिता जाहिरातीचा मजकूर (Adaptation, Translation, Formating from one media to other media) | १०,००० | १ | १०,००० | १,८०० | **११,८००** |
| | **टिव्हीसी** | | TVC - ६० Sec. - As per DAVP rate | ७,००,००० | १ | ७,००,००० | १,२६,००० | **८,२६,०००** |
| | **जिंगल्स/ स्पॉट** | | Audio Jingle (६० Sec.) | ४५,००० | १ | ४५,००० | ८,१०० | **५३,१००** |
| | **Total - A** | | | | | **७,५५,०००** | **१,३५,९००** | **८,९०,९००** |

**जाहिरात प्रसिद्धी तपशील (Details of Advertisement)**

| | Media | मूळ दर, प्रक्रिया | Details | वारंवारिता | संख्या/ दिवस | एकूण अंदाजित रक्कम | जीएसटी | एकूण अंदाजित रक्कम (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | **मुद्रित माध्यमे (जाहिरात** | | | | | | | |
| १ | वर्तमानपत्रे | शासनमान्य दर | वृत्तपत्र जाहिरात ( राज्यातील मोठा आणि मध्यम संवर्गातील निवडक मराठी दैनिके) | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १ दिवस | २५,००,००० | १,२५,००० | **२६,२५,०००** |
| | **इलेक्ट्रॉनिक माध्यमे (वृत्तचित्र शाखा)** | | | | | | | |
| १ | दूरदर्शन | केंद्र सरकारचा दर | टिव्हीसीचे प्रसारण - सायं. ७.०० बातम्यांच्या पूर्वी व मध्यंतरात जाहिरात प्रसारण | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ५,००,००० | ९०,००० | **५,९०,०००** |
| २ | मराठी वृत्त वाहिन्या | CBC (DAVP) यादीवरील व दर | ४५ ते ६० सेकंद जाहिरातींचे प्रसारण - प्रत्येक बँडमध्ये नमूद दराच्या मर्यादेत समसमान जाहिरात प्रसारण | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | ३५,००,००० | ६,३०,००० | **४१,३०,०००** |
| ३ | एफ एम वाहिन्या | CBC (DAVP) दर | राज्यातील एफ एम रेडिओ वाहिन्यावरुन ऑडिओ जिंगलचे प्रसारण | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १५,००,००० | २,७०,००० | **१७,७०,०००** |
| ४ | आकाशवाणी केंद्र | केंद्र सरकार दर | जिंगल्स / स्पॉटचे सकाळी ७.१० आणि सायंकाळी ७ वाजता बातम्यांच्या मध्यंतरात एक वेळा (केंद्र शासनाचे दर) | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १० दिवस | १०,००,००० | १,८०,००० | **११,८०,०००** |
| | **समाज माध्यमे व डिजीटल माध्यमे (नव माध्यम शाखा)** | | | | | | | |
| १ | सोशल मिडीया (Social Media) | विहित ई-निविदा प्रक्रियेद्वारे | शासन निर्णय दि. २३.११.२०२३ मधील संस्थांच्या सुचीमधील संस्थांमार्फत विहीत कार्यपद्धतीचे अवलंब करुन प्रसिद्धी करणे शक्य होईल. या माध्यमांच्या संस्थेनी निविदेमध्ये नमूद केलेल्या दराने प्रसिद्धी करण्याचे प्रस्तावित | नमूद अंदाजित रकमेच्या मर्यादेत | ३० दिवस | ५०,००,००० | ९,००,००० | **५९,००,०००** |
| | **बाह्य माध्यमे (प्रदर्शने शाखा)** | | | | | | | |
| १ | खाजगी होर्डिंग्ज | CBC (DAVP) यादीवरील व दर | पुणे, मुंबई आणि नागपूर शहारातील भाडे तत्वावरील खाजगी होर्डिंग्ज As per Availability | अंदाजित रकमेच्या मर्यादेत | १५ दिवस | १५,००,००० | २,८५,००० | **१७,८५,०००** |
| | | | | | **Total - B** | **१,५५,००,०००** | **२४,८०,०००** | **१,७९,८०,०००** |
| | | | | | **TOTAL (A + B)** | **१,६२,५५,०००** | **२६,१५,९००** | **१,८८,७०,९००** |
| १ | शा.नि. दि. १३.८.२०२१ नुसार रु.५.०० कोटी इतक्या रकमेपर्यंतच्या प्रसिद्धी आराखड्यासाठी एकूण खर्चाच्या ४% (रु.२० लाख) आणि त्यापेक्षा प्रत्येक वाढीव रकमेसाठी २% (उर्वरित रकमेवर (रु.५ कोटी वजाजाता)) प्रमाणे | शासन निर्णय तरतुदीनुसार | माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला येणारा कार्यालयीन उपकरणावरील खर्च, सॉफ्टअवेर, तात्पुरता मनुष्यबळावरील खर्च, संशोधन खर्च, वाहतूक खर्च, इतर किरकोळ खर्च | | | ६,५०,२०० | | **६,५०,२००** |
| | | | | | **TOTAL EXPENDITURE** | **१,६९,०५,२००** | | **१,९५,२१,१००** |

***********